# फार्म मशिनरी बँक योजना




धनश्री निगडे — आचार्य पदवी विद्यार्थीनी
अनिल आडे — आचार्य पदवी विद्यार्थी
सविता ढोके — आचार्य पदवी विद्यार्थीनी
विस्तार शिक्षण विभाग,
कृषी महाविद्यालय,
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी


आपणा सर्वांना माहितच आहे की सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी सरकार वेळोवेळी शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या योजना सुरू करत असते. आज आपण अशाच एका योजनेबद्दल जाणून घेऊयात, ती म्हणजे फार्म मशिनरी बँक योजना. यामध्ये फार्म मशिनरी बँक योजना म्हणजे काय? त्याचा हेतू काय आहे? त्याचे फायदे, वैशिष्ट्ये, पात्रता, अर्ज प्रक्रिया इ. बद्दल जाणून घेऊ.

### फार्म मशिनरी बँक योजना म्हणजे काय?

आजच्या युगात मशिन शिवाय शेती करणे खूप अवघड आहे. हे लक्षात घेऊन फार्म मशिनरी बँक योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत खेड्यांमध्ये मशिनची उपलब्धता वाढविण्यासाठी फार्म मशिनरी बँक स्थापन केली जाते. खेड्यातील कोणतीही व्यक्ती फार्म मशिनरी बँक उघडू शकते. ज्यामध्ये ते इतर शेतकऱ्यांना भाड्यावर यंत्रसामग्री देतील. फार्म मशिनरी बँक उघडण्यासाठी सरकारकडून अनुदानही दिले जाते.

### फार्म मशिनरी बँक योजनेचे उद्दीष्ट:

या योजनेचे मुख्य उद्दीष्ट म्हणजे शेतकऱ्यांना भाड्याने शेतीसाठी यंत्रसामग्री उपलब्ध करून देणे. ही बँक कोणीही उघडू शकते. ही बँक देखील उत्पन्नाचा एक चांगला स्रोत होईल. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल आणि वेळेचीही बचत होईल. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीमध्ये सहजता मिळेल आणि त्यांचा वेळ आणि पैशांची बचत होईल.

### शासकीय अनुदान:

फार्म मशिनरी बँक उघडण्यासाठी सरकारकडून ८० % अनुदान देण्यात येत आहे. शेतकऱ्यांना खर्चाच्या २० % पैसे मोजावे लागतील. या योजनेंतर्गत दहा लाख रुपयांपासून ते एक कोटीपर्यंत अनुदान दिले जाते. फार्म मशिनरी बँक योजनेंतर्गत मशिनरीवर ३ वर्षांतून एकदाच अनुदान दिले जाते आणि १ वर्षाच्या आत शेतकरी तीन प्रकारच्या मशिनवर अनुदान घेऊ शकतात. या योजनेंतर्गत अनुसूचित जाती, जमाती, महिला, बीपीएल कार्डधारक आणि लहान शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येते.

### फार्म मशिनरी बँक योजनेची पात्रता व आवश्यक कागदपत्रे:

- या योजनेत अर्ज करण्यासाठी अर्जदार हा कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
- अर्जदाराचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे.
- आवश्यक कागदपत्रे- आधार कार्ड, रेशन कार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटो, मशिनरी बिलाची प्रत, बँक खाते पासबुक, निवास प्रमाणपत्र, वय प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र इ.

### फार्म मशिनरी बँक योजनेंतर्गत कस्टम हायरिंग सेंटर:

फार्म मशिनरी बँक योजनेंतर्गत देशभरात कस्टम हायरिंग सेंटर तयार केले जात आहेत. ज्याद्वारे शेती यंत्रणेच्या बँका सुरू केल्या जातील. या योजनेंतर्गत आतापर्यंत ५० हजाराहून अधिक कस्टम हायरिंग सेंटर उघडण्यात आले आहेत. या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी शासकीय अधिकृत पोर्टल व मोबाइल ॲप देखील सुरू करण्यात आले आहे. या माध्यमातून शेतकरी फार्म मशीनरी बँक सुरू करण्यासाठी अर्ज करू शकतात. या योजनेंतर्गत शेतकरी अनुदानावर बियाणे, खते पेरण्याचे यंत्र, नांगर, थ्रेशर, टिलर, रोटावेटर यासारख्या मशिन खरेदी करू शकतात.



### कस्टम हायरिंग सेंटरचे (सीएचसी) युनिट:

सीएचसी ही मुळात शेती यंत्रसामग्री, उपकरणे आणि अवजारे यांचा एक समूह असतो ज्यामध्ये शेती यंत्रे भाड्याने दिली जातात. जरी काही अवजारे व उपकरणे हि विशिष्ट पिकांसाठी वापरली जातात जसे की ट्रॅक्टर, पॉवर टिलर इ. आणि स्वयंचलित यंत्रसामग्री जसे की कंम्बाईन

हार्वेस्टर्स इ. सामान्यत: वापरले जातात. म्हणूनच एक आदर्श मॉडेलची स्थापना केली गेली ज्यामध्ये शेतातील सर्व पिकांना जी यंत्रसामग्री सामान्यत: वापरली जातात ती उपलब्ध करून देण्यात येते.

### कस्टम हायरिंग सेंटरचे व्यवस्थापन:

कस्टम हायरिंग सेंटरच्या व्यवस्थापनासाठी गावपातळीवर ग्रामीण हवामान जोखीम व्यवस्थापन समिती (व्हीसीआरएमसी) ची स्थापना करण्यात आली असून त्यात १२ ते २० ग्रामस्थांचा समावेश असून अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष म्हणून नामित सदस्य असतात. व्हीसीआरएमसीच्या नावे एक बँक खाते उघडले जाते आणि कोणत्याही दोन स्वाक्षऱ्याद्वारे ते चालविले जाते. समिती वेगवेगळ्या अवजारासाठी भाड्याने देण्याचे शुल्क निश्चित करते आणि भाड्याने देण्याचे दर फलक तयार करते. तसेच समितीकडून महसूल आणि खर्चाचा तपशील नियमितपणे तपासला जातो.

### कस्टम हायरिंग सेंटरची उद्दीष्टे:

- छोट्या व सीमांत शेतकऱ्यांना शेती यंत्रे / उपकरणे उपलब्ध करुन देणे
- शेती अवजारे वेळेवर उपलब्ध करून देणे
- लागवडीचा खर्च कमी करणे
- कमी मशिनरी उपलब्ध असलेल्या ठिकाणी यांत्रिकीकरण सुधारणे
- वेगवेगळ्या शेती कामांसाठी विविध कृषी यंत्रे / अवजारे भाड्याने देणारी सेवा पुरविणे
- विशेषत: पीक हंगामात मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरणाचा विस्तार करणे
- कमी शेती असणाऱ्या जिल्ह्यांत यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन देणे
- कुशल कामगार आणि छोट्या कारागीरांना कामाची संधी उपलब्ध करुन देणे



फार्म मशिनरी शेड



फार्म मशिनरी दर फलक



ग्रामीण हवामान जोखीम व्यवस्थापन समिती (व्हीसीआरएमसी) ची मिटिंग

(फार्म मशिनरी बँक योजनेसाठी अर्ज Direct Benefit Transfer in Agriculture Mechanization या वेबसाईटवर करावा. तसेच गुगल प्ले स्टोअर वर CHC फार्म मशिनरी ॲप सुद्धा उपलब्ध आहे.)

(संपर्क: +९१ ९९७५२९५८००)

★ ★ ★